
म. ग्रं. सं. ठाणे.
काव्य
२५५८



REFBK-0025678
REFBK-0025678

सुधीर मोघे

संदर्भ काव्य

२५७०
२५६५८
१२।५।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. २५७०
काव्य २५६५८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत) १२।५।८८

## सुधीर मोघे यांचे प्रकाशीत साहित्य

स्वतंत्रते भगवती

भारतीय स्वातंत्र्य लढ्यावर आधारीत गीतसंग्रह

पक्ष्यांचे ठसे

काव्यसंग्रह

निरंकुशाची रोजनिशी

ललित गद्य

## सुधीर मोघे : आगामी साहित्य—

शब्दधून

कविता

उमरखय्याम

कविता

गाण्यांची वही

भावगीत व चित्रपटगीत

# लय

सुधीर मोघे

REFBK-0025678

शब्दपर्व प्रकाशन

मुखपृष्ठ । मांडणी : अरुण घाटे

प्रथम आवृत्ती : मे १९८८

© सौ. शुभदा सुधीर मोघे.
१०२-१०३/७ भोंडे कॉलनी,
एरंडवन, पुणे-४११ ००४.

वितरण
ग्रंथाली
वाचक चळवळ

प्रकाशक :
शब्दपर्व
३५/९४८ नेहरु नगर, कुर्ला (पू.)
मुंबई-४०० ०२४.

मुद्रक :
रचना मुद्रण,
वडाळा, मुंबई-४०० ०३१.

मूल्य २५ रु.

"प्रिय सौ. शुभदा,
—तुलाच !"

## ऋणनिर्देश

'लय' हा माझा दुसरा काव्यसंग्रह पुस्तकाच्या रूपात पाहणं ही माझ्या लेखी अतिशय आनंददायी घटना आहे.

एका पावसाळ्यात सुमारे पंधरावीस दिवसांच्या कालावधीत ह्या कविता माझ्या मनात उतरल्या. कवितेनं समूहानं भेटायला येण्याचा हा माझा 'शब्दधून' नंतरचा दुसरा अनुभव ! एक गोष्ट मुद्दाम स्पष्ट करतो की कवितेचा 'रुबाई' किंवा 'कणिका' असा कुठलाही रुढ आकृतिबंध माझ्या मनासमोर ह्या कविता लिहिताना नव्हता. मनाची जी एक मजेदार तंद्री लागली होती त्या तंद्रीनंच एक 'लय' निवडली होती. आणि त्या लयीच्या लवलवत्या रेषेवर अनेक संवेदना, जाणिवा व अनुभूती ओवल्या जात होत्या. त्यातल्या जेवढ्यांना शब्द सापडले त्यांच्या कविता झाल्या. ह्या

कवितांची जी विशिष्ट मांडणी माझ्याकडून झाली आहे तोही त्या मनात रुणझुणणाऱ्या 'लयी'चाच परिणाम ! ह्या कवितामागची माझी मूलभूत मनोभूमिका कळावी म्हणूच हे लिहिलं. याहून अधिक मीच माझ्या कवितेविषयी निदान ह्या वेळी बोलणं योग्य नव्हे हे भान मला आहे.

'पक्ष्यांचे ठसे'ची पहिली आवृत्ती संपून दुसरी आवृत्ती प्रकाशनाच्या मार्गावर असताना आणि 'कविता पानोपानी'हा आत्माविष्काराचा प्रयोग रंगभूमीवरं ताठ उभा रहात असतानाच 'लय' प्रकाशित होते आहे हा योग मला अतिशय सुखद वाटतो.

पण ह्या घटनेचं संपूर्ण श्रेय श्री. सुधीर नांदगांवकर ह्या मित्राला द्यायला हवं. सहज बोलावे तसे बोललेले शब्द त्यांनी शंभर टक्के खरे केले. कसलीही कसर न ठेवता हे पुस्तक तेच प्रकाशित करताहेत. काव्यसंग्रहाच्या दृश्य रुपाची संपूर्ण जबाबदारी श्री. अरुण घाटेंनी आत्मीयतेनं सांभाळली आहे. प्रा. शंकर वैद्यांसारख्या चिकित्सक व साक्षेपी कविची प्रस्तावना ही तर बहुमोल गोष्ट ! त्यांच्या प्रचंड व्यापातून ह्या कामासाठी त्यांनी सवड काढली पण ही सवड त्यांनी 'आवडी'नं काढली ही गोष्ट मला अधिक मोलाची वाटते.

'लय'च्या वितरणाची जबाबदारी स्वीकारणारी ''ग्रंथाली' व तदनुषंगिक बारीकसारीक गोष्टीत आपुलकीनं व डोळसपणे रस घेणारे श्री. दिनकर गांगल. आणि सदैव माझ्या पाठीशी उभा राहणारा माझा समृद्ध मित्र परिवार. ह्या सर्वांचं ऋण कसं व्यक्त करावं ते समजत नाही. पण तरीही ते व्यक्त करायलाच हवं कारण तेच ह्या लेखनाचं मुख्य प्रयोजन आहे.

**सुधीर मोघे**

## प्रस्तावना

चित्रपटांतील काही गीतांमुळे आणि नामवंत गायकांनी गायिलेल्या अन्य गीतरचनांमुळे सुधीर मोघे हे नाव आता मराठी रसिकांच्या परिचयाचे झाले आहे. मोघे यांनी गीतांचे केवळ लेखन केले आहे असे नाही तर गीतांना चाली देणे, त्यासाठी योग्य ती संगीत-रचना करणे, त्यांचे गायन करणे याशिवाय इतर कवींच्या गीतांचे वा कवितांचे कार्यक्रम निवेदनासहित सादर करणे या गोष्टीही त्यांनी यशस्वी रीत्या केलेल्या आहेत. नाटकातल्या एखाद्या छोट्या भूमिकेत काम करताना रंगभूमीवरही ते वावरले आहेत. एकंदरीने सुधीर मोघे हे बहुरंगी व्यक्तित्व आहे आणि कलाक्षेत्रात विविध उपक्रम त्यांनी केले आहेत. त्यांच्या अनेक गुणांचा आविष्कार ज्यात एकत्रित स्वरूपात पाहावयास मिळतो असा 'कविता पानोपानी'या

शीर्षकाचा कार्यक्रम सध्या ते अनेक ठिकाणी सादर करीत असतात. या कार्यक्रमात वाद्यसंगीत व गायनाला स्थान असले तरी या कार्यक्रमाचा मूलाधार काव्यरचना आहे ही गोष्ट मला महत्त्वाची वाटते. कलेच्या विविध क्षेत्रांत वावरतानाही कवित्वाची जोपासना मोघे यांच्याकडून होते आहे याचे ते निदर्शक आहे. काही वर्षांपूर्वी त्यांचा 'पक्ष्यांचे ठसे'हा कविता-संग्रह प्रसिद्ध झाला तेव्हा हाच दिलासा मनाला मिळाला होता. आता प्रसिद्ध होत असलेल्या त्यांच्या 'लय'या रुबाया-कणिका धर्तीच्या काव्य-संग्रहामुळे मोघे यांच्या एकूण कलाजीवनातले कवितेचे स्थान अधिक स्पष्ट होते आहे आणि त्याचबरोबर त्यांच्या कवित्वाचे पैलूही अधिकाधिक स्पष्ट होत आहेत.

या संग्रहात चार-चार ओळींची एकेक छोटी कविता आहे. अशा या रचनेतल्या चार ओळी म्हणजे एक स्वयंपूर्ण कविताच असते. चार ओळींत व्यक्त करता येईल असा एखादा भावानुभव, साक्षात्कारासारखे जाणवून गेलेले जीवनांगाचे दर्शन, बोध सुचवून जाणारा वेधक प्रसंग, चार ओळींतच परिपूर्णतेने येणारे एखादे निसर्गाच्या अवस्थेचे रूप, एखादा विचार, असे काही या चार ओळींतून काव्यात्मपणे व्यक्त होत असते. सुभाषितवजा रचनाही यात सामावू शकते. चार ओळींचाच हा एक रचनाबंध असला तरी अशा अनेक मुक्तकांतून, त्यांचे मूलभूत स्वतंत्रपण न गमावता,एक सूत्र एखादा कवी गुंफू शकेल, गुंफू शकतो. चार ओळींतच अनुभव प्रभावीपणे प्रकट व्हावा, त्याला वेधकता यावी म्हणून त्या ओळींच्या रचनेची, मांडणीच्या व्यूहाची काही ठोक तंत्रेही निर्माण होतात विरोध साधून रचना करणे, उत्सुकता निर्माण करीत अपेक्षित अर्थाला वेगळी कलाटणी देणे; चमकदार, लोकविलक्षण कल्पनेने वा विचाराने चकित करणे असे त्यांतले काही मार्ग आहेत. यातूनच या रचनेत चतुराईचा थोडा भाग शिरू शकतो. वाचक गृहीत धरून रचना केली जाते. पण एखादा कवी, हे सारे सांभाळून आणि/किंवा त्याच्या स्वतंत्र मार्गाने जाऊन

सुंदर रचना करतो. मोघे यांच्या 'लय'या संग्रहातील काव्य, प्रेम, निसर्ग आणि जीवन या विषयांशी संबंधित असलेल्या एकूण त्र्यहात्तर रचनांपैकी सुमारे पंचवीसएक रचनांच्या बाबतीत ही किमया कमी-अधिक प्रमाणात मोघे यांना साधलेली आहे असे मला वाटते. आणि हे यश मला कमी मोलाचे वाटत नाही.

मोघे यांनी त्यांच्या कवितांत मनाच्या खेळाचे अनेक ठिकाणी वर्णन केले आहे. त्या मनालाही मन असते आणि ते मन मात्र आपल्या कह्यात राहाणारे नसते. (३). त्या मनाच्या वर्तनाचा अंदाज बांधता येत नाही. कधी ते मन निरिच्छ आणि कोरे आहे असे जाणवते पण-असे असूनही 'गिरविता अहेतुक रेषांचे गुंडाळे । बोटांवर अवचित मन ओठंगुन आले' (४१) असा चमत्कार घडून येतो. कधी आपण काहीतरी सांगायचे असे मनाशी पक्के केलेले असते पण सांगायला जाताच ध्यानात येते की 'पण सांगु लागता आपण नसतो वक्ता । 'सांगणे' सांगते आणि आपण 'श्रोता' (४५) असा अतर्क्य अनुभव वाट्याला येतो. मनाचे हे वर्तन अनाकलनीय आहेच परंतु त्यावर पाळत ठेवणारेही एक मन आहेच आणि ते मन मोघे यांच्यापाशी आहे हे मला कलादृष्टया महत्त्वाचे वाटते आहे. हे मन नुसते साक्षी वा पाळत ठेवणारे नाही तर त्या त्या परिस्थितीचा, भावस्थितीचा सौंदर्यात्मक आकार जाणणारे आणि त्याला उचित पद्धतीने, शिताफीने शब्द-बद्ध करणारे असे आहे आणि म्हणूनच विविध विषयांशी संबंधित अशा भावस्थिती, क्षणार्धात दर्शन देऊन अंतर्धान पावणारे क्षण त्यांच्या कवितांत सुंदरपणे प्रकटले आहेत.

प्रेमातल्या एका अनुभवाकडे या दृष्टीने वळता येईल. सखीची रूपे बदलत गेली आणि तिच्या अगोदरच्या रूपाहून भिन्न असे रूप डोळ्यांसमोर उभे राहून क्षणभर ती अनोळखी वाटली तरी तो तिला ओळखतो हा अनुभव

मराठी ग्रंथ संग्रहालय
२५७८
क्रमांक २५६७८
३२५७८
शाखा (स्थळ

एका कवितेत आलेला आहे. त्या ओळी अशा आहेत—

*कधि गौर बसंती कधी सावळी छाया*
*कधि वेल कृशांगी कधी पुष्कळा काया*
*दर वळणावरती अनोळखी झालीस*
*मी ओळखिले;...तू...होय,तूच आलीच*

यात पहिले म्हणजे त्या दोघांतल्या खेळकर नात्याचे हृद्य चित्रण आहे. 'तो तिला ओळखतो'हा हळू हळू प्रकटत स्पष्ट झालेला अर्थ अखेरी महत्त्वाचा आहे. यातून अनेक गोष्टी सूचित होत राहातात. यातून त्याचे मन आणि त्याच्या व्यक्तित्वाचा एक पैलू दिसून जातो. तो तिला ओळखतो याचा अर्थ रूप वेगळे असले तरी तो तिचे आंतरिक व्यक्तित्व ओळखतो, जे त्याला आवडते, हा भाव यातून व्यक्त होतो. याचमुळे वरवर हलक्याफुलक्या वाटणाऱ्या रचनेला वजन प्राप्त होते. या रचनेत जो हलकेफुलकेपणा आलेला आहे तो तिच्या विविध रूपांनी अवतरण्याच्या क्रियेचा,तिच्या व्यक्तिमत्वाचा एक भागच आहे. याशिवाय या हलकेफुलकेपणाशी संबंध आहे तो दोघांतल्या नात्यातल्या लडिवाळपणाचा. अशा अनेक अर्थछटांनी ही कविता भरते. या अनुभवाचे आविष्करण मोठ्या कौशल्याने घडले आहे हेही येथे नमूद करावेसे वाटते. 'मी ओळखिले;...तू...होय, तूच आलीस'या ओळीतून त्या क्रियेतली प्रत्येक पायरी गतिमानतेने ओलांडली जाऊन 'होय तूच आलीस' हा क्षण साक्षात्कारासारखा पुढे येतो हे या रचनेतले कौशल्य आहे.

दोघांच्या मानसिक नात्यातल्या अनुभवाचे चित्रण करणारी आणखी एक रचना उद्धृत करावीशी वाटते—

तो आणि ती या दोघांच्या नात्यातल्या मानसिक संवादाचे, द्वैताची अवस्था कायम राहूनही त्यातून घडणाऱ्या त्यांच्या मनोमीलनाचे व त्या अवस्थेचा

आस्वादही ते घेत असल्याच्या अनुभवाचे सुंदर आविष्करण खालील ओळींत दिसते.

*ना सागताच तू मला उमगत सार*
*कळतात तुलाही मौनातील इशारे*
*दोघांत कशाला मग शब्दांचे बांध*
*'कळण्या'चा चाले 'कळण्या'शी संवाद...*

इथे तिने न सांगताच त्याला तिच्या मनातले सारे कळते आहे आणि तिलाही त्याच्या मौनातले इशारे कळताहेत. आणि हे सारे असे परस्परांना कळते आहे हेही त्यांना कळते आहे. ही मानसिक संवादाची तरल अवस्था नेमकी हेरून अतिशय सहजपणे मोघे यांनी व्यक्तविली आहे. येथे 'कळण्याचा' आणि 'कळण्याशी'या दोन शब्दांत 'कळणे'या अर्थाचे नाते आहेच पण हा सुसंवाद व्यक्त करताना शब्दांच्या नादातही सुसंवाद जमल्याने या आविष्करणाच्या गोडीत मोठी भर पडली आहे.

कोठलीही भावस्थिती चितारताना मोघे तिला मोजक्या शब्दात चित्ररूप देतात किंवा एखादे दृश्य वा निसर्गचित्र उभे करीत त्यातून भावस्थिती चित्रित करतात. 'ती दूर तरळती धूसर रेषा हलते । ते क्षितिज खरोखर नसते, तरिही दिसते' (५४) असे लिहून जे नसते तेही पुसट जसे जाणवते तसे ते रेखाटून जातात. अल्याड आणि पल्याड म्हणजे हे जग आणि परलोक. या दोन्ही तीरांवर वस्ती असल्यासारखी 'भासते' पण मधली नदी दिसत नाही आणि पलीकडे नेणारी नावही दिसत नाही असे म्हणत ते त्या भासाला आणि अभावाला प्रतिमांनी रूप प्राप्त करून देतात पण अर्थातून मात्र 'आभास-अभाव' जाणवत राहील असे अवधान बाळगतात. जे सांगायला फार कष्ट पडावेत ते येथे अगदी सहजपणे साधले जाते. याच पद्धतीने वातावरण निर्माण करणे व ते भावसूचक ठेवणे हेही मोघे यांच्याकडून सहजपणे घडते.

निसर्गाचे दृश्य उभे करून त्यातून भाव सूचित करणाऱ्या अनेक रचना या संग्रहात आहेत. तेथे रंगरूपांच्या छटांसह चित्रण येते. 'घननील रान घननील रातिला भिडले' (१६) आणि गोऱ्या चांदण्यात निळा अंधार मिसळला तेव्हा 'जे काही घडले' त्यातून उमटलेल्या 'सृजनाचा हुंकार' व्यक्त करताना ते अतिशय सूचकतेने, तरलपणे मिलनाची अवस्था सूचित करून जातात. 'सर कोसळली' (२८) ही एक रचना अशीच आहे. कधी प्रतीकात्मक दृश्यातून वा दृष्टांतात्मक उदाहरणातूनही ते असा भाव सूचित करतात (क्र. ११, ५८). आणि एखादे केवळ निसर्गाचे चित्र असले तरी ते भावच्छटांनी जिवंत होते.

*ही दरी धुक्याचे तळे जणू अनिवार*
*सांडला केशरी कुंभ उठे झंकार*
*कोवळ्या तृणांना जणू उन्हाचे डोळे*
*उमटले कळीवर पाय दवांचे..ओले..*

हे एक अशा प्रकारचे दृश्य आहे. धवल धुके आणि त्यात सांडला गेलेला केशरी रंग यातून ज्या छटा उसळल्या त्याचे वर्णन त्यांनी 'उठे झंकार' असे सुरांच्या आधाराने केले आहे. रंगाची जाणीव पेलायला सुरांची कल्पना पुढे आली व एक सुंदर परिणाम साधून गेली. या दृश्यात जी कोवळीक आणि हळुवारपणा आला आहे तोही लक्षणीय आहे.

निसर्गातून हे असे भाव व्यक्त करताना किंवा मूळ चित्राला एकेका शब्दांनी दुसऱ्या अर्थाची मिती प्राप्त करून देताना कवितेत एकेक शब्द ती दुसऱ्या अर्थाची कड निर्माण करीत जातो. उदा. 'सर कोसळली...सर कोसळली...' एवढ्या शब्दानंतर 'विरहार्त' हा शब्द येतो आणि लागलीच 'सरींचा' अर्थ बदलतो; आणि आभाळ 'हुंगते' म्हटल्यावर त्या एका क्रियापदाने आभाळाला मन प्राप्त होते (२८). 'तू-मी दोघे नि दर्या होता

तिसरा' (१४) येथे 'दर्या'हा समुद्र अर्थानेच प्रतीत होतो पण भरतीची वाट पाहून नंतर,'वेडावुन दर्या दोघांवर कोसळला' अशी ओळ जेव्हा येते तेव्हा त्या दर्यातून आता प्रणयभावनेची भरती सूचित होते. मनातली अर्थ सौंदर्याची छटा व्यक्त करण्यासाठी शब्दयोजना मोघे कशी समर्पकतेने, कुशलतेने करतात हे या काही उदाहरणांवरून कळेल.

मोघे यांच्या भाषेसंबंधी थोडे लिहावयास हवे. त्यांची भाषा अगदी सहज स्वरूपाची, ओघवती आणि बोलल्यासारखी वाटावी अशी आहे. रचनेवर आणि वृत्तरचनेवरही त्यांची पकड असल्याने 'मी तुझ्या घराशी खरेच होतो आलो' (१३); 'मी ओळखिले;...तू...होय, तूच आलीस' (५); 'वाटले—संपले, कविता सोडुन गेली' (२३); 'झाले ते झाले...एक कळेना फक्त' (३८) अशा बोलण्याचा ढंग घेऊन येणाऱ्या ओळी ते त्या मात्रावृत्ताची लय सांभाळून सहजपणे लिहून जातात. त्याचे मन शब्दांशी क्रीडा करताना, त्यांच्या नादमय संबंधांवर प्रेम करताना दिसते. 'घननीळ रान घननीळ रातिला भिडले । सावळे डोह सावळ्या सावल्या ल्याले' (१६) या ओळींतील शब्दांची सुखद पुनरावृत्ती, 'मन झुरू लागले...तिथेच कविता झरली' (२३) येथे 'झुरणे' आणि 'झरणे' यांचा अनुप्रासांबरोबरच जमलेला कारण-कार्यसंबंध, 'वठलेल्या होत्या फांद्या परवा परवा । आभाळ कोरडे होते परवा परवा' (२७). यातली 'परवा'ची मनावर अर्थ बिंबवणारी पुनरावृत्ती यांनी या कवितांत गोडवा निर्माण होतोच पण अर्थच्छटातही भर पडते. या कवितांच्या रचना किती तऱ्हांनी झाल्या आहेत, त्यात कोणत्या तंत्रांची पुनरावृत्ती झाली आहे हाही एक प्रश्न या कवितांबाबत निर्माण होतो. पण विस्तारभयास्तव तो टाळतो. तसेच या काव्य प्रकारासंबंधीची चर्चाही बाजूला ठेवतो.

या संग्रहातल्या रुबाया वृत्तीच्या ज्या रचना आहेत त्यात आयुष्यासंबंधीचे

काही विचार आलेले आहेत. विचार आहेत पण तीत सुसूत्र विचारसरणी मात्र नाही. त्यांत तात्त्विकदृष्टया काही सलग, सखोल, जीवनदृष्टी शोधता येणार नाही. विविध प्रसंगी सुचून गेलेले असे ते विचार आहेत. 'आपण कोण ? कोठून येतो ? कुठे जायचे ?' असे एरव्हीचे गहन प्रश्न येथे आहेत आणि त्याचे उत्तर 'या प्रश्नां उत्तर द्याया मृत्यू येई अन् वाट नव्या प्रश्नांच्या जन्मा जाई' असे आहे (७). या प्रश्नाचे दुसरे कल्पनाधिष्ठित उत्तर असे की 'मूळचे विश्व वर कुठेतरी आहे, तेथे निरंकुश सत्याच्या तेजात तेथले जीव जगतात आणि 'त्यांच्याच पृथ्वीवरल्या सांवल्या आपण आहोत' (६५) हा अशाश्वताचा शाश्वतसा व्यापार आहे आणि 'मरण हा या जीवन-गीताचा लय ताल आहे' (२१). एकंदरीने, अशा प्रकारचे विचार व कल्पना या कवितांत आलेल्या आहेत. हा विषय फार गंभीर व गहन असल्याने हे कवितांतले विचार वरवरचे वाटले तर नवल नाही. अनेक ठिकाणी तसे ते आहेतही. पण हे विचार मांडले जात असताना कल्पना-प्रतिमांच्या आधारे ते जेव्हा रूप धारण करू लागतात तेव्हा त्य विषयाचे कवीला जाणवलेले काही नाते आपणांस गोचर होऊ लागते. उदाहरणार्थ, आत्मा अमर आहे, तो जन्म घेतो आणि पुन्हा परत जातो अशी विधाने जेव्हा 'वासांसि जीर्णांनि यथा विहाय...' अशा प्रतिमात्मक भाषेत व्यक्त होतात तेव्हा एक अनुभव चित्रच डोळ्यांसमोर येते. 'वासांसि जीर्णांनि..' म्हटल्यावर एकदम खूप काही कळल्यासारखे वाटते ही शक्ती त्या प्रतिमेची आहे. मात्र अशा आविष्करणात जे केवळ कल्पनारम्य स्वरूपाचे आणि सांकेतिक असे आहे त्यात स्वारस्य निर्माण होणे शक्यच नाही. पण ज्यात काही स्वतंत्र जाणीव आहे, आकलनात, आविष्करणात स्वतंत्रपण आहे ते मन आकर्षून घेणारच. अशा काही रचना या संग्रहात कुठे कुठे दिसतात. उदा.—

*ती दूर तरळती धूसर रेषा हलते*
*ते क्षितिज खरोखर नसते, तरिही दिसते*
*उगवतीस आणि सरत्या सायंकाळी*
*क्षितिजाची जाणिव भासे दोन वेळी*

या ओळी मन वेधून घेतात. आकाश आणि पृथ्वी यांचा परस्परस्पर्श झाल्याचा भास जन्म आणि मरण या दोन प्रसंगीच होतो, अशी एक जाणीव माझ्या मनाला या दृश्याच्या आधारे कळते, तिचा मनाला स्पर्श होतो. 'उगवतीस आणि सरत्या सायंकाळी'हे शब्द जन्म आणि मरण या अवस्था सूचित करतात असे मला वाटते. याच दृष्टीने 'तो पैल असावा' (क्र.६७), 'ऐन्यात बिलोरी' (क्र.५९) अशा काही रचना मला भावतात आणि

*आकाश कुणाचे ? पृथ्वी ही कोणाची ?*

अशा अनेक प्रश्नांचे 'जो होईल 'त्या'चा केवळ त्याचे; त्याचे...'(१) हे उत्तर, 'जो 'तन्मय' होईल त्याचे'या भूमीकेवरून मला वेधक वाटते.

सुधीर मोघे यांच्या कवितांतले काही दोष मला जाणवले आहेत त्यांचाही येथे उल्लेख करावयास हवा. शब्दांच्या पुनरावृत्तीने रचनेत कसा गोडवा निर्माण होतो याची काही उदाहरणे या अगोदरच्या विवेचनात मी सांगितलेली आहेत. परंतु अशा प्रकारच्या शब्द-योजनेची एक लकब तयार होऊन तिचा अतिरेक होतो आहे असे या रचनांत दिसते. आणि हे विविध तऱ्हांनी घडताना दिसते. शब्दांच्या पुनरावृत्तीत भर घालणाऱ्या 'मनाचे मन', 'हृदयाचे हृदय' (क्र.३) 'माझ्यामधला मी' (८) अशा रचना काही ठिकाणी येतात. 'शब्दांच्या हृदयी बीजांकुर मौनाचा । मौनाच्या गर्भी एक मळा...शब्दांचा' (६) अशी विरोधावर आधारलेली पण काहीशी निरर्थक वाटणारी रचना कुठे आलेली दिसते. 'आयुष्य इमानी

आयुष्याशी राही' (१०) म्हणजे काय ? असा प्रश्न विचारायला लावणारा व उगाच गोंधळात टाकणारी रचना आढळते.

*मी माझ्यामधल्या मला एकदा भिडलो*
*मी माझ्यामधल्या माझ्यावरती भुललो*
*मी माझ्यामधल्या मलाच सांगत सुटलो*
*मी माझ्यामधल्या...मला भेटुनी आलो*

या ठिकाणी तर शब्दांच्या मोहाने अतिशय पोकळ रचना झालेली दिसते. आणखी एक गोष्ट अशी की अनेकदा प्रश्नार्थक रचना येते. पण काही ठिकाणी मुख्य प्रश्न संपल्यानंतरचे प्रश्न जागा भरण्यासाठी आल्यासारखे वाटतात (१,७). काही रचना ओढून ताणून केल्यासारख्या वाटतात (६१,६३,६४), असे काही दोष मला येथे नमूद करावेसे वाटतात. यांतल्या शब्दांच्या पुनरावृत्तीच्या हव्यासाने कविता चकव्यात सापडल्यासारखी वाटते आणि तिची विश्वसनीयता व अर्थवत्ता मार खाते. परंतु हे दोष टाळून काव्यलेखन करण्याची कुवत मोघे यांच्यामध्ये आहे याची मला खात्री आहे व हा विश्वास त्यांच्या रचनांनीच निर्माण केलेला आहे.कवितेच्या संबंधातल्या काही रचना या संग्रहात आहेत. आपण कवितेच्या हाती हात दिला होता पण तो सुटला याची तीव्र खंत मोघे,यांना जाणवली होती. पण

*वाटले—संपले, कविता सोडुन गेली*
*मन झुरु लागले...*
*तिथेच कविता झरली*

असा सुखद अनुभव त्यांना आला. तेव्हा आता एकाहून एक सरस रचना त्यांच्याकडून लिहन व्हाव्यात अशी अपेक्षा बाळगायला हरकत नाही.

**शंकर वैद्य**

१ आकाश कुणाचे ?
पृथ्वी ही कोणाची ?
जन्मांकित, मरणांकित
यात्रा कोणाची ?
हे गूढ पुरातन विश्वचक्र कोणाचे ?
जो होइल 'त्या'चा
केवळ - त्याचे; त्याचे..

२ मी ओंजळ माझी
रितीच घेऊन आलो
जाताना -
ओंजळ रितीच ठेवुन गेलो
ओंजळीत आल्या गेल्या श्रेयांवरती
पण - पुसट..कोवळे
नाव कोरुनी गेलो

३ मी किती मनवुनी
मन माझे वश केले
मन परी मनाचे
तरिही फितूर झाले
ही कशी उमटती वलयामधुनी वलये ?
हृदयास हृदय...
त्या हृदयालाही हृदये ?

४ हे तारांगण
हे गूढ गहन आकाश..
हा अवकाशाचा
खोल, निरामय श्वास...
हे ओंकाराच्या गाभ्यामधले मौन...
ह्या पुरातनातिल
काय खरे प्राचीन ?

५ कधि गौर बसंतां
कधी सावळी छाया
कधि वेल कृशांगी
कधी पुष्कळा काया
दर वळणावरती अनोळखी झालीस
मी ओळखिले;...तू...
होय, तूच आलीस

मराठी ग्रंथ संग्रहालय

८ शब्दांच्या हृदयी
बीजांकुर मौनाचा
मौनाच्या गर्भी
एक मळा...शब्दांचा...
एकाच्या मरणावरी दुज्याचे जनन
कोणाच्या सरणावरी
कुणाचे सृजन ?

७ तू कोण ?...कोठला ?
कुठुनी येसी येथे ?
तू कोण ?...कोठला ?
तुला जायचे कोठे ?...
ह्या प्रश्नां उत्तर द्याया मृत्यू येई
अन् वाट
नव्या प्रश्नांच्या जन्मा जाई

८ मी माझ्यामधल्या मला
एकदा भिडलो
मी माझ्यामधल्या
माझ्यावरती भुलली
मी माझ्यामधल्या मलाच सांगत सुटलो
मी माझ्यामधल्या...
...मला...भेटुनी आलो

९ जे ठाऊक नव्हते
तेही जाणुन झाले
मग होते-नव्हते
क्षणी 'नाहिसे' झाले
मी फळा मनाचा पुसून केला स्वच्छ
कण बोटांवरती
कसे चिकटुनी आले ?

१० आयुष्य...कुणाच्या
कधिही स्वाधिन नसते
आयुष्य ... स्वतःचे
भाकित बांधुन बसते
आयुष्य इमानी आयुष्याशी राही
आयुष्य स्वयंभू
अशाश्वताच्या डोही

११ तीराला असतो
पाण्याचा आधार
लाटांत विरघळे
जडभारी संसार
आटते नदी अन् पात्र कोरडे होते
तीराच्या नशिबी
वाट पाहणे येते

१२ जे पुरे आंधळे
त्यांचे डोळे तीक्ष्ण
जे डोळस...त्यांना
दिसती केवळ प्रश्न
'त्या' अंधाराला तेजाचे वरदान
हे डोळे
केवळ काळोखाची खाण

१३ मी तुझ्या घराशी
खरेच होतो आलो
थबकलो...जरासा-
क्षणात मागे फिरलो
किति दूर पोचलो सर्व तोडुनी धागे
क्षण वळुन पाहिले...
...तुझा उंबरा मागे !

१४ तू-मी दोघे नि
दर्या होता तिसरा
वर...
एकांताचा होता गूढ पहारा
पाहून वाट भरतीची शिणला...थकला
वेडावुन दर्या
दोघांवर कोसळला

१५ ना सांगताच तू
मला उमगते सारे
कळतात तुलाही
मौनातील इशारे
दोघांत कशाला मग शब्दांचे बांध
'कळण्या'चा चाले
'कळण्या'शी संवाद...

१६ घननीळ रान
घननीळ रातिला भिडले
सावळे डोह
सावळ्या सावल्या ल्याले
चांदण्यात गोऱ्या भिने निळा अंधार
दूरात दर्वळे
सृजनाचा हुंकार

१७ मी रित्या आभाळी
रिता मेघसा होतो
शून्यात बिंब
शून्याचे रेखित होतो
जागले काय ?...हे कुठले वारे सुटले ?
शब्दात...
मनाचे थेंब दाटुनी आले

१८ ही दरी
धुक्याचे तळे जणू अनिवार
सांडला केशरी कुंभ
उठे झंकार
कोवळ्या तृणांना जणू उन्हाचे डोळे
उमटले कळीवर
पाय दवाचे...ओले...

१९ हा सूर अनाहत
कोठुनि आला येथे
हा जिथे तरंगे
तेथे गाणे उमटे
हा अखंड अविरत अथक वाहता राहे
हा सूर जणू
शब्दांचे हृद्गत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. क्र. २५७९
२५६७
१२१७
शाखा ठाणे

२० लय एक हुंगिली
खोल खोल श्वासांत
ओवीत चाललो
शब्दांच्या धाग्यात
लहडला वेल...तो पहा निघाला गगनी
देठांना फुटल्या
कविता पानोपानीं

२१ हा अशाश्वताचा
शाश्वतसा व्यापार
हा अनिश्चिताचा
निश्चितसा संसार
ह्या जीवनगीता मरण जणू लय ताल
पोकळीत
पृथ्वी...बेदरकार...खुशाल

२२ ह्या पागोळ्या
हे झरे...धबधबे वेडे
ही डबकी...ओहळ
आणि रांगडे ओढे
हे पाणी एकच - जरी वेगळे वेष
हा सांबजटेतील
स्वर्गंगेचा वंश

२३ कवितेच्या हाती
हात दिलेला होता
गर्दीत सोडला हात...
हरवलो पुरता
वाटले, संपले; कविता सोडुन गेली
मन झुरू लागले...
तिथेच कविता झरली

२४ कळले ना ?
जगणे गाणे आहे सारे
कोणीही गावो
लागलेत तंबोरे
रे जगणे म्हणजे...संथ स्वराचा श्वास
अन् मरण ?
जणू ही दोन स्वरांतिल आस

२५ ठरलेले सारे
जणू ठरवुनी चुकते
हुकलेले सारे
नको तिथे कडमडते
जो कुणी तिथे ही प्यादी मारित बसला
त्याचाच घोळ हा-
त्याचे "चुकते कोठे"?

२६ येताना येथे
मनात नसता येतो
जाताना इथुनी
मनात नसता जातो
एकूण मनाची ही ''पत'' हा ''अधिकार''
का तरिही त्याचा
इथे तिथे बडिवार ?

२७ वठलेल्या फांद्या होत्या
परवा . परवा
आभाळ कोरडे होते
परवा . परवा
नादला एकदा आषाढाचा "झाला"
झाडांतुन
हिरवा पाऊस दाटुन आला

२८ सर कोसळली
सर कोसळली विरहार्त
मनचिंब चराचर
झरत्या आवेगात
ओलेपण भटके मुक्त, धीट, बेबंद
आभाळ हुंगते
उग्र दाट मृद्‌गंध

२९ त्या तिथे दूर
ती दोन जगांची रेषा
ती रेघ घडविते
नव्या लिपीची भाषा
हा संधिकाल - क्षण इथे विसावू माथा
संपेल ''कांहिसे''- समोर
बघता बघता

३० जगण्याला
लोभस स्वप्नांचा आधार
मिटताच पापण्या
स्वप्ने अपरंपार
जर उभ्या जिण्याला स्वप्नांचाच हवाला
मग निद्रेचे भय-
आणि खंत कशाला ?

२९ त्या तिथे दूर
ती दोन जगांची रेषा
ती रेघ घडविते
नव्या लिपीची भाषा
हा संधिकाल - क्षण इथे विसावू माथा
संपेल "कांहिसे"- समोर
बघता बघता

३० जगण्याला
लोभस स्वप्नांचा आधार
मिटताच पापण्या
स्वप्ने अपरंपार
जर उभ्या जिण्याला स्वप्नांचाच हवाला
मग निद्रेचे भय-
आणि खंत कशाला ?

२९ त्या तिथे दूर
ती दोन जगांची रेषा
ती रेघ घडविते
नव्या लिपीची भाषा
हा संधिकाल - क्षण इथे विसावू माथा
संपेल ''कांहिसे''- समोर
बघता बघता

३० जगण्याला
लोभस स्वप्नांचा आधार
मिटताच पापण्या
स्वप्ने अपरंपार
जर उभ्या जिण्याला स्वप्नांचाच हवाला
मग निद्रेचे भय-
आणि खंत कशाला ?

३१ मोजून चालणे
तुला कसे साधावे ?
मोजून चालता
वाट मनी खंतावे
पथ अमर्याद जर अनंतात जातील
पायात इंद्रिये
चालाया येतील

३२ मन ओथंबुन
मज सांगत होते काही
मी तसा चतुर
ऐकून ऐकले नाही
ती ओढ आर्जवी ओलांडुनिया गेलो
मी कसा
मनाच्या मनोगताला भ्यालो ?

३३ भलत्या काळी
तो भलते काही जगला
भलभलत्या गुंत्यातून
भला तो सुटला
भलत्या वाटांना अजून गुंगत जातो
त्या भलत्या सलत्यातून
नेमके घेतो

३४ आवेग आंधळा
धीमेपण...संताप
वैराग्य...क्षुधा
तृप्तीचे भक्कम माप
म्यानात किती समशेरी लपुनी बसती
व्यक्तीत एकट्या
किती राहती व्यक्ती ?

३५ सूर्यांचे कोटी वंश
कोटि ग्रहगोल
विश्वांचे विश्व विराट
तोल; कल्लोळ
अवघडते, सजते, गजबजते अवकाश
पोकळी भोगते
अस्तित्वाचा भास

मराठी ग्रंथ संग्रहालय

३६ शेवटी भेटलो होतो
आपण येथे
ह्या इथेच वळले
दुरावणारे रस्ते
तेव्हा मी फिरलो इथेच येता येता
पण आज थबकलो येथे-
जाता जाता

३७ हा झोत मनाचा
अवचित ये· आकारा
मिटल्या ओठांचा
असुनी सक्त पहारा
क्षण सावरलेला नकळत गेला, गेला
मी आवरलेला
शर हातातुन सुटला

३८ तू वेध घेतला
आणि साधला नेम
त्या क्षणापूर्वि तर
होते सारे क्षेम
झाले ते झाले...एक कळेना फक्त
का तुझ्या काळजातुनी
झिरपते रक्त ?

३९ आषाढ अगोदर
सर्वांगातुन स्मरला
आषाढ हवेच्या
नसानसातुन फिरला
आषाढ दाटल्या आभाळातुन झरला
आषाढ अखेरी
शब्दांमधुनी स्फुरला

४० आकाश तरंगे
उंचावरती दूर
मातीच्या हृदयी
झुरणीचे काहूर
जाणून घेउनी अतृप्तांचे हेतू
कोसळता पाऊस
झाला मीलनसेतू

४१ एकांत, लेखणी, कागद-
वाया सारे
मन कागदाहुनी
निरिच्छ आणि कोरे
गिरविता अहेतुक रेषांचे गुंडाळे
बोटांवर अवचित
मन ओठंगुन आले

४२ ह्या देहामधल्या पोकळीत
जे लपले
अन् आकाशाच्या पाकळीत
जे भरले
त्या चैतन्यांची जुळली आहे प्रीत
पण अडसर केवळ होय,
त्वचेची भिंत

४३ सूर्याची
पिवळी भगभगणारी ज्योत
अवकाश तडकले
वादळ. काळोखात
कंदील भडकला, जमे काजळी काळी
प्राणांची व्याकुळ
भिरभिरते पाकोळी

४४ माझ्याही नकळत
कुठे कुठे मी रमतो
ना कुठे थांबतो
तरी मनातुन जमतो
ह्या जड देहाची अनंत मरणे मरतो
पण तरी नकळता
इथे वा तिथे, उरतो

४५ जे सांगायचे
ते असते ठरलेले
घोकून मनाशी
पक्केही केलेले
पण सांगु लागता आपण नसतो वक्ता
"सांगणे" सांगते
आणि आपण..."श्रोता"

४६ क्षण कधी वाटते
कुठेच नाही अर्थ
कधि वस्तू-वस्तूमध्ये
दिसे परमार्थ
ही नजर पाहते आणि ठरविते सारे
ही नजर पहाया
नजर कुणी मज द्या रे

४७ प्रतिबिंब पाहुनी
दुसऱ्याच्या डोळ्यात
ठरविसी आपुली
जगण्याची तू रीत
धुळफेक असली पाहुन रात्री दिवसा
भंगतो बिलोरी
तुझ्या मनाचा आरसा

४८ हे खरेच आहे
की मी इथला नाही
पण कुठला तेही
मलाच ठाउक नाही
कधि जाणवते-हे विश्व पोरके आहे
ह्या विश्वाचे
मज विश्व व्हायचे आहे

४९ रक्तात सळसळे
मूळ मनस्वी रंग
प्राशून
केशरी समर्पणाचा भोग
दर्वळून भिनला गंध गुलाबी हळवा
खोलात - दूरचा
अंश विरागी भगवा

५० आयुष्य तुझे
वर्षात नको तू तोलू
ओंजळीत गळक्या
नको चिरंतन झेलू
हा देह विनाशी फक्त बदलतो धाम
आयुष्य खरे तर
जन्मांचा मुक्काम

५१ फसशील-
इथे जे दिसते ते मायावी
ही रानसराई
सहज सावजां भुलवी
ही भूमी जगवी फक्त विषाचे कोंब
रे पांथस्था
तू नकोस थांबू; थांब

मराठी ग्रंथ संग्रहालय
शाखा

५२ बहुतेक
अनुभवाच्या दारीं जातात
तिथुनीच परतुनी
वर ''अनुभव'' लिहितात
जो अनुभवातुनी आरपार जाईल
तो अनुभव 'होइल'
अनुभूती देईल

५३ संपते कैद-
बेछूट मनाचा पक्षी
आभाळ मोकळे
उदंड श्वास उराशी
पाठीवर घरकुल - अता न वळणे मागे
पंखांना हसती
पायी...रेशिमधागे

५४ ती दूर
तरळती धूसर रेषा हलते
ते क्षितिज
खरोखर नसते, तरिही दिसते
उगंवतीस आणि सरत्या सायंकाळी
क्षितिजाची जाणिव भासे
दोनच वेळी

५५ आकाश
मातिचा रंग लेवुनी नटले
मेघांत ऋणाइत
ऋण पृथ्वीचे दडले...

...मातीला पडली भूल श्याम-मोहाची
झाडांना, चढली
झिंग...पावसाळ्याची

५६ हमरस्त्यावर
मी माझ्या जाता जाता
पाहिली वाकडी वाट
थबकलो नुसता
मुरडले नाक अन् सहज पाहिले खाली
दचकलो—
वाट ती माझ्या पायाखाली

५७ जगताना नव्हते
लिहिण्याचे मज भान
जगण्यात गुंतले होते
पुरते प्राण
थांबलो जरासा - जरा उतरला कैफ
अन् सुटे मनाचा
गहिरा अनवट गोफ

५८ पुंगीत गारुडी
पेरित जाई प्राण
डोलतो त्यावरी
नाग भान हरपून
जणु इंद्रजाल विणतात स्वरांचे धागे
विळख्यात गुंतले
नाग; गारूडी-दोघे

५९ ऐन्यात बिलोरी
कधी जळाच्या काठी
बिंबाच्या प्रतिबिंबाच्या
गाठीभेटी
कधि जाणवते का प्रतिबिंबाला खंत ?
बिंबाच्या हाती
अपुला आदि. अंत

६० कुणि बेरजेतला
कुणी वजाबाकीचा
कुणि सदा 'भागला'
कुणी गुणाकाराचा
व्यवहारी गणितामधे रीत-'नाविन्य'
सर्वांचे अंती उत्तर
एकच - शून्य

६१ मुक्काम स्वतः जर
आरंभास्तव झुरतो
जो इथुन निघाला
सरळ तेथवर जातो
इतुके जर सारे साधे सोपे असते
का तेल घडाभर
नमनावरती जळते ?

६२ मी कधीकाळचा
घर सोडून निघालो
अन् मलाच शोधित
दिशां दिशांतून फिरलो
क्षण दर्पणात पाहुनी स्वत:ला-भ्यालो
"जो" शोधित होता
"तो"ही हरवुन बसलो

६३ जर गोकुळ सोडुन
गेला नसता कृष्ण
तर काळ गोठला असता
होउन प्रश्न
जर गोकुळ सोडुन गेला नसता कृष्ण
तर खुद्द कृष्णाही
उरला नसता ''कृष्ण''

६४ भोगाने
त्यागाच्याही वाटे जावे
त्यागानेही
भोगाला नीट पहावे
भोगास नसावी कुठे जायची बंदी
त्यागाला थोडी
त्यागाचीच - सुसंधी

६५ वर दूर कुठेतरि
विश्व मूळचे आहे
त्या तिथे निरंकुश
सत्य नांदते आहे
तेजात तयाच्या जीव तेथले जगती
त्यांच्याच सावल्या
आपण...पृथ्वीवरती

६६ तो झाडाखाली
कण्हे मूक पाचोळा
घेऊन उशाशी
स्वप्ने चोळामोळा
उठताच धुळीची चक्री हाक सभोती
ही पिकली पाने जातिल
दूर; दिगन्ती

६७ तो पैल असावा
जिथे शेवटी ठाव
राहतो इथे
हा म्हणू आपला गाव
भासते-असावी वस्ती दोन्ही तीरी
ना नदी दिसे;
ना दिसे नाव; नेणारी

६८ ही लय
प्रलयाच्या तांडवात घुमणारी
आकाराच्या देहातुन
लवलवणारी
लय विश्वामधला रुणझुणता आभास
मरणाच्या तिमिरी
लय - मिणमिणता श्वास

६९ हे सात स्वरांचे ब्रह्म
नाव - आयुष्य
वर सप्तरंग लुटणारे
इंद्रधनुष्य
त्या पल्याड येतिल कवेत स्वर्गहि साती
त्या तिथवरती
लय सप्तपदी..सांगाती

७० कुठवरी लिहावे ?
लिहून होणे नाही
किती सांगितले तरि
राहुन जाइल काही
अर्धाच सोडुनी लढा—जायचे अंती
ध्वज नाचत राहिल
कुणाकुणाच्या हाती

७१ तू दिलास
आयुष्याला कठोर शाप
तो शाप असा की
जगणे व्हावे पाप
उमगले मोल श्वासांचे - आले भान
आभार - दिले तू शापातुन
वरदान

७२ पाऊस किती दिवसात
फिरकला नाही
पाऊस कुणाला
कधीच कळला नाही
पाऊस ऋतूंचे निमित्त करुनी दिसतो
पाऊस पापणीआड
...कधीचा...असतो

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५७८
२५६७८
२५६७८
शाखा (स्थळ प्रत)
REFBK-0025678
REFBK-0025678

७३ ह्या निःशब्दाच्या आड
कूजिते कुठली ?
पानांच्या रेषांतुनी
भाकिते कसली ?
होशील एकटा तू देहाच्या पैल
सोबतीस तेथे
कविता फक्त असेल

लय एक हुंगिली
खोल खोल श्वासांत
ओवीत चालली
शब्दांच्या धाग्यात
लहडला वेल...तो पहा निघाला गगनी
देठांना फुटल्या
कविता पानोपानीं